# भारतीय कृषी क्षेत्र : अनुकूलता आणि प्रतिकुलता

**Asst. Prof. Lalchandra R. Sante**
Department of Economics
Shantarambhau Gholap Arts, Science And
Gotirambhau Pawar Commerce College Shivle
Tal - Murbad, Dist - Thane 421401

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जातो.भारतीय अर्थव्यवस्थवेत शेती क्षेत्राला असाधरण महत्त्व आहे. कोणत्याही देशाच्या एकुण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा वाटा जास्त असल्यास तो देश कृषी प्रधान देश म्हणुन ओळखला जातो. भारतात आजही जवळपास 60% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबुन आहे. शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते. भारतात स्वातंत्र्यानंतर औद्योगिकरण वाढले असले तरीही शेती क्षेत्राचा हिस्सा फार कमी झालेला नाही. एखाद्या वर्षी भारतात शेतीच्या पिकाचे नुकसान झाल्यास संपुर्ण अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होते. भविष्यात आर्थिक विकासाची गती वाढून शेतीवर अवलंबुन असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होणार असते. तरीही भारताचा आर्थिक विकास हा पुष्कळ प्रमाणात शेतीवर अवलंबुन असल्याने शेतीचे महत्त्व जास्त राहणार हे उघड आहे. भारतात 1951 पासून पंचवार्षीक योजनेला सुरुवात झाली. एक–दोन पंचवार्षिक योजना सोडल्या तर भारतातील सर्व पंचवार्षिक योजनामध्ये शेतीला महत्त्व दिलेले आहे. विकसीत देशाचा विकास विचारात घेता त्या देशांनी सर्वात प्रथम आपल्या कृषी क्षेत्राचा विकास केला होता व नंतर यांनी औद्योगिकरणाला सुरुवात केली. याचाच अर्थ भारताला विकसित व्हायचं असल्यास सर्वात प्रथम कृषी क्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. परंतु 21 व्या शतकाला सुरुवात होऊन देखील भारतीय कृषीक्षेत्राला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जागतीकिकरणाच्या काळात शेतीक्षेत्राला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. प्रस्तुत निबंधात भारतीय शेतीक्षेत्रासमोर असणारी प्रतिकुलता व कृषीक्षेत्रात असलेल्या अनुकूलता यांचा उहापोह करण्यात आला आहे.

**भारतीय भूमीची भौगोलिक स्थिती**

| | | |
|---|---|---|
| भारताचे भौगोलिक क्षेत्र | – | 3287732 वर्ग किलोमीटर |
| उत्तर दक्षिण लांबी | – | 3214 किलोमीटर |
| पूर्व पश्चिम लांबी | – | 2933 किलोमीटर |
| क्षेत्रीय सीमा | – | 15200 किलोमीटर |
| समुद्र सीमा | – | 6100 किलोमीटर |

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की, भारतात जवळपास 329 मिलीयन हेक्टर जमिन उपलब्ध आहे. त्यापैकी फक्त 305 मिलियन हेक्टर जमिनीविषयी आकडेवारी व दस्तऐवज उपलब्ध आहेत.

**भारतीय भूमीचा उपयोग :**

भारतात एकुण उपलब्ध असलेल्या भूभागाचा उपयोग वेगवेगळया उपयोगासाठी कसा केला जातो त्या संदर्भात आकडेवारी खाली दिली आहे.

**भारतीय जमिनीचा उपयोग**

| क्र. | भूमी उपयोग | क्षेत्रफळ (मिलीयन हेक्टर) | एकुण भुमीशी % |
|---|---|---|---|
| 1. | एकुण भागोलिक क्षेत्रफळ | 329 | – |
| 2. | एकुण उपयोगसाठी जमिन | 305 | 100 |
| 3. | पडीत आणि कृषी योग्य नसलेली जमिन | 41 | 13 |
| 4. | जंगलासाठी राखीव जमिन | 68 | 22 |
| 5. | चारा क्षेत्रासाठी जमिन | 12 | 04 |
| 6. | कृषीयोग्य परंतु पडिक जमिन | 19 | 06 |
| 7. | क्षारयुक्त जमिन | 32 | 08 |
| 8. | लागवडीखालील एकुण क्षेत्रफळ | 124 | 46 |
| 9. | एकापेक्षा अधिक लागवडीसाठीची जमिन | 43 | 14 |
| 10. | एकुण कृषीयोग्य जमिन | (8+9) 185 | 60 |

वरील तक्यात असे निदर्शनास येते की,

- भारतात एकुण जमिनीपैकी मोठया प्रमाणात जमिन लागवडीखाली योऊ शकते.
- एकूणजमिनीपैकी 60 % जमिन लागवडीखाली आहे.
- एकुण भूभागापैकी 68 मिलियन हेक्टर जमिन जंगलासाठी राखीव आहे.
- चारा क्षेत्रासाठी 04 %जमिन आहे.
- एकूण भूभागापैकी 13% भूभाग कृषीसाठी योग्य नाही.

**भारतातील शेती क्षेत्रातील पिक वितरणाचे स्वरुप**

भारतात कृषी उत्पादनाचे दोन भाग पडतात.

1) खाद्यान्न (Food - grain)

2) अखाद्यान्न (Non - Food - grain)

या दोन कृषी उत्पादनाचे 21 व्या शतकापर्यंत लागवडीखाली असलेल्या क्षेत्रफळाचे विवरण पुढील तक्त्यात दिले आहे.

**पिक वितरणाचे स्वरुप (% )**

| | 1950 – 51 | 1970 – 71 | 1980 – 81 | 2001 – 2002 |
|---|---|---|---|---|
| 1) खाद्यान्ने | 74 | 78 | 80 | 75 |
| 2) अखाद्यान्ने | 26 | 22 | 20 | 25 |
| एकूण | 100 | 100 | 100 | 100 |

स्त्रोत – भात सरकार आर्थिक समीक्षा 2002 – 2003

वरील तक्त्यात असे दिसते की, 1950 – 51 % मध्ये एकूण लागवडी खालील क्षेत्रापैकी 74 % क्षेत्रावर खाद्यान्ने च 26 % भूक्षेत्रावर अखाद्यान्ने पिक घेतले जात होते. सन 1980 पर्यंत खाद्यान्नेचे प्रमाण वाढुन 80 % पर्यंत गेले. परंतु हे प्रमाण

2001 – 2002 मध्ये 75 % पर्यंत कमी झाले आहे. अखाद्यान्नाचे प्रमाण 1980 – 81 पर्यंत 20 % पर्यंत कमी झाले होते. ते 2001 – 2002 मध्ये 25 % पर्यंत वाढले.

स्वातंत्र्यानंतर प्रमुख पिकांच्या क्षेत्रफळात झालेली वाढः

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या प्रमुख खाद्यान्ने व अखाद्यान्नाच्या क्षेत्रफळात वाढ पुढील तक्त्यात दाविली आहे.

**प्रमुख पिकांच्या क्षेत्रफळातील वाढ (लाख हेक्टर मध्ये)**

| | पिक | 1949 – 1950 | 1964 – 1965 | 2001 – 2002 |
|---|---|---|---|---|
| 1) | सर्व प्रकारची खाद्यान्ने | 990 | 1180 | 1220 |
| 2) | सर्व प्रकारची अखाद्यान्ने | 230 | 330 | 380 |
| | एकूण | 1220 | 1510 | 1600 |

**स्त्रोत – भारत सरकार आर्थिक समिक्षा 2002 – 2003**

वरील तक्त्यात असे दिसते की भारतीतील खाद्यान्ने व अखाद्यान्ने या दोन्ही प्रकारच्या पिकांत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वाढ झालेली दिसुन येते. खाद्यान्नाचे क्षेत्रफळ 1949 – 50 मध्ये 990 लाख हेक्टर होते हे प्रमाण वाढून 2001 – 02 मध्ये 1220 लाख हेक्टर झाले आहे. तर अखाद्यान्नाचे क्षेत्रफळ 1949 – 50 मध्ये 230 लाख हीक्टर होते ते 2001 – 02 मध्ये 380 लाख हेक्टर झाले आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील मुख्य पिकांच्या उत्पादनातील वुद्धी (उत्पादन लाख टन)**

| पिकाचे प्रकार | 1949 – 50 | 1964 – 65 | 2001 – 02 |
|---|---|---|---|
| 1) तांदुळ | 240 | 390 | 830 |
| 2) गहू | 60 | 120 | 720 |
| 3) भरड धान्य | 170 | 250 | 440 |
| 4) डाळी | 80 | 120 | 130 |
| 5) तेलबिया | 50 | 90 | 200 |
| 6) उस | 500 | 1220 | 3000 |
| 7) बटाटे | 20 | 40 | 220 |
| 8) कापूस | 30 | 60 | 100 |

स्त्रोत – भारत सरकार आर्थिक समिक्षा 2002 –03

वरील तक्त्यात असे दिसते की, स्वांतंत्र्यप्राप्तीनंतर तांदुळ, गहू व उस या तीन पिकांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. डाळींचे उत्पादन फारसे वाढलेले दिसत नाही. इतर पिकांच्या उत्पादनात थोडया प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

**भारतीय कृषी क्षेत्रासमोरील प्रतिकुलता :**

भारतीय अर्थव्यवस्थेला कृषीप्रधान अर्थव्यवस्था असे म्हटले जाते. भारतात मोठया लोकसंख्येकडुन मोठया क्षेत्रावर शेती केली जाते. पण विकसीत देशाची तुलना करता भारतीय शेती मागासलेली दिसुन येते. 21 व्या शतकाची सुरुवात होऊन देखील भारतातील शेतीचा विकास फारसा झालेला दिसुन येत नाही. जागतिकिकरणाच्या युगात शेतीक्षेत्रासमोर अनेक अनुकूलता आहेत. त्याचबरोबर अनेक प्रतिकुलता ठाकलेली आहेत. भारतीय कृषीसमोर असलेली प्रतिकुलता स्वीकारल्या शिवाय व उपलब्ध अनुकूलता स्विकारल्याशिवाय भारतीय शेतीचा व पर्यायाने भारताचा विकास होणे शक्य नाही. भारतीय कृषीक्षेत्रासमोर उभी असलेली प्रतिकुलता पुढील प्रमाणे :

**1) उत्पादकतेत वाढ करणे :**

इतर विकसीत देशाची तुलना करता भारतातील कृषी उत्पादकता अतिशय कमी आहे. शेतीची उत्पादकता ही दर हेक्टरी व दर व्यक्ती मोजली जाते. भारतात या दोन्ही प्रकारच्या उत्पादकता कमी आहेत. हया उत्पादकता वाढल्याशिवाय शेतीचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकत नाही. शेतीक्षेत्राचा लहान आकार, तुकडीकरण यांत्रिकीकरणाचा अभाव इत्यादीमुळे भारतातील कृषी उत्पादकता कमी आहे. खालील तक्त्यात इतर देशाची तुलना भारताची कृषी उत्पादकता दर्शविलेली आहे.

**भारताची पिकानुसार उत्पादकतेची इतर देशांची तुलना**

| तांदुळ | | गहू | | तेलबिया | | कापूस | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| देश | उत्पादकता | देश | उत्पादकता | देश | उत्पादकता | देश | उत्पादकता |
| इजिप्त | 9.8 | इंग्लंड | 7.7 | जर्मनी | 4.0 | चीन | 11.1 |
| अमेरिका | 7.8 | फ्रान्स | 7.5 | अमेरिका | 2.6 | ब्राझील | 10.9 |
| कोरीया | 6.7 | चीन | 4.2 | अर्जेटिना | 2.5 | अमेरिका | 9.5 |
| जपान | 6.4 | जग | 2.8 | ब्राझील | 2.4 | पाकीस्तान | 7.6 |
| जग | 3.9 | भारत | 2.7 | जग | 1.8 | जग | 7.3 |
| भारत | 2.9 | पाकीस्तान | 2.3 | भारत | 0.8 | भारत | 4.6 |

स्त्रोत – संयुक्त राष्टांचे साख्यंकिय विभाग

वरील तक्त्याचा विचार करता असे दिसते की, प्रमुख पिकांच्या उत्पादकतेबाबत भारत हा विकसीत राष्ट्रांच्या तसेच जागतिक सरासरी उत्पादकतेच्या खूप मागे आहे. तांदळाची जागतिक सरासरी उत्पादकता 3.9 आहे तर भारताची उत्पादकता 2.9 आहे. इतर पिकांची उत्पादकतासुद्धा कमी आहे. भारताची कमी उत्पादकता वाढविण्याचे प्रतिकुलता भारताच्या कृषी क्षेत्राकडे आहे.

**2) शेतमजुर :'**

भारतात शेतीसाठी शेतमजूर उपलब्ध होण्याचे आव्हान उभे राहिले आहे. भारतातील तरुण पीढीचा शेतीकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे. तसेच शेतमजुरांच्या मजुरीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढला आहे. भारतात ग्रामीण भागातुन शहरी भागात लाकांचे सथलांतर वाढले असल्यामुळे ग्रामीण भागात शेतमजुरांची उपलब्धता कमी झाली आहे. तसेच अशिक्षीत मजुंरामुळे शेतीची उत्पादकता कमी होते. तसेच बऱ्याच ठिकाणी शेतमजुरांना हंगामी रोजगार उपलब्ध होत असल्यामुळे शेतमजुरांनी शहराकडे धाव घेतली आहे.

**3) बाजारपेठ :**

भारतात कृषी क्षेत्रासमोर सर्वात महत्त्वाचे आव्हान बाजारपेठेच्या उपलब्धतेचे आहे. भारतात शेतकरी उत्पादन घेत असले तरी यांना आपल्या मालाची विक्री मध्यस्थांच्या माध्यमातुन करावी लागते. त्यामुळे त्यांना आपल्या मालाला कमी किंमत मिळते. कृषी विपणातुन शेतमाल मोठया साखळीद्वारे बाजारपेठेत दाखल होत असतो. त्यामुळे प्रत्येक स्तरावर कमिशन घेतले जाते. काही ठिकाणी बाजारपेठ दुर अंतरावर असल्यामुळे शेतकऱ्यांना त्या बाजारपेठेत वस्तुंची विक्री करणे परवडत नाही. तसेच बऱ्याच ठिकाणी व्यापाऱ्याकडुन वजन–माप इत्यादीद्वारे शेतकऱ्यांची फसवणुक केली जाते.

जागतिकिकरणाच्या आजच्या युगात भारतीय शेतकऱ्यांना देशी बाजारपेठेत शेतमालांची विक्री करतांना विदेशी मालाशी स्पर्धा करावी लागते. विकसीत देशाच्या शेतमालाची किंमत शक्यतो कमी असल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करता येत नाही. तसेच भारतीय शेतमालाचा दर्जा कमी असल्यामुळे विदेशातुन त्यांना कमी मागणी येते.

**4) चिरंतन विकास :**

भारतीय शेतीक्षेत्रासमोर शेतीचे चिरंतर विकास करण्याचे आव्हान उभे आहे. चिरंतन विकासात वर्तमानकालीन विचार न करता शेतीचा भविष्यात विचार करणे आवश्यक आहे. आजच्या पिढीबरोबरच भविष्यात येणाऱ्या पिढीसाठी शेतमाल कसा टिकेल

याचा विचार चिरंतन विकासात केला जातो. भारतात शेती करतांना फक्त वर्तमानकाळाचा विचार केला जातो. त्यामुळे भविष्यात शेती उत्पादन कसे वाढेल याचाही विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये शेती करतांना पर्यावरणीय सिद्धांताचा आधार घेणे गरजेचे आहे. शेतीत केल्या जाणाऱ्या रासायनीक खते व किटकनाशकांच्या अतिरेक वापरामुळे भविष्यात शेती क्षेत्राची उत्पादकता कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**5) शेतकऱ्यांच्या आत्महत्या :**

भारतात शेतीक्षेत्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमणण थांबविण्याचे आव्हान शेतीक्षेत्रापुढे आहे. 1990 नंतर भारतात शेतकऱ्यांच्या आत्महत्येस सुरुवात झाली. मागच्या काही वर्षाच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण खालील तक्त्यात दिले आहे.

| वर्षे | शेतकऱ्यांच्या आत्महत्या |
|---|---|
| 2010 | 15,964 |
| 2011 | 14,027 |
| 2012 | 13,754 |
| 2013 | 11,772 |
| 2014 | 12,360 |

वरील तक्तयानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे स्वरुप लक्षात येते. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समजल्या जाणाऱ्या राज्यातसुद्धा शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. पिकांचे नुकसान कर्जबाजारीपणा, कमी किंमत यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत.

**6) कर्जाची उपलब्धता :**

शेती क्षेत्रात शेतकऱ्यांना शेतीत सुधारणा करण्यासाठी बियाणांची खरेदी करणे, अवजारे, खते खरेदी करणे व इतर कारणांसाठी कर्जाची आवश्यकता असते. पण भारतात शेतकऱ्यांना कर्जाची उपलब्धता सहजासहजी होत नाही NSSO च्या सर्वेक्षणानुसार भारतात शेतकऱ्यांकडुन घेतल्या जाणाऱ्या एकुण कर्जापैकी 2012 साली संस्थत्मक स्त्रोतांकडुन 59.8 % कर्ज पुरवठा केला जात होता. तर बिगरसंस्थात्मक स्त्रोताकडुन 40.2 % कर्ज पुरवठा शेतकऱ्यांना केला जात होता. याचाच अर्थ सरकारी संस्थांकडुन आजही शेतकऱ्यांना पूर्ण कर्जाची उपलब्धता होत नाही शेतकऱ्याना आजही सावकार, जमिनदार, व्यापारी, दलाल, मध्यस्थ, मित्र–नातेवाईक दत्यादी स्त्रोताकडुन कर्ज घ्यावे लागते. या क्षेत्राकडुन त्यांचे मोठया प्रमाणात शोषण केले जाते. त्यामुळे हे शोषण थांबविण्याचे आव्हान आहे.

**7) जलसिंचन :**

भारतात जलसिंचनाच्या साधनांची कमतरता दिसुन येते. भारतात शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबुल आहे. भारतात विहीरी, कालवे, तलाव, धरणे कुपनलिका इत्यादीद्वारे शेतीसाठी पाणी पुरवठा केला जातो. पण हयांची संख्या अतिशय कमी आहे. भारतात बऱ्याच राज्यात पाण्याची पातळी खाली गेली आहे. त्यामुळे पीण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतीसाठी वर्षभर पाणीपुरवठार करण्याचे आवहान शेतीपुढे उभे आहे. सध्या अर्धवट असलेल्या प्रकल्पांची बांधणी करुन ही समस्या सोडविता येईल उसासरख्या पिकाच्या बाबतीत आज पुर्नविचार करण्याची वेळ आली आहे.

**8) नैसर्गिक आपत्ती :**

आज भारतीय शेतीक्षेत्रावर नैसर्गिक आपत्तीचे सावट आहे. प्रत्येक वर्षी पूर, अवर्षण, दुष्काळ, चक्रीवादळ, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्ती शेतीसमोर उभ्या आहेत. त्या दुर करण्याचे आव्हान शेतीक्षेत्रासमोर आहेत. योग्य नियोजन करुन या नैसर्गिक आपत्ती दुर करता येऊ शकतील.

**9) शेतजमिनीचे तुकडीकरण/लहान धारणा क्षेत्र :**

भारतात शेतजमिनीचे होणारे तुकडीकरण थांबविण्याचे आव्हान शेतीक्षेत्राकडे आहे. भारतात वारसा हक्क कायदा असल्यामुळे लोकसंख्या वाढीबरोबर शेतजमिनीचे लहान–लहान आकारात तुकडे पडतात. लहान धारणाक्षेतत्रात आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य नसते. त्यामुळे शेतीत यंत्राचा वापर कमी केला जातो त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होते.

**10) शासनाची उदासिनता:**

भारतातील शेतीक्षेत्रासमोर शासनाच्या उदासिनतेचे आव्हान आहे. शासनाकडुन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत. सरकारच्या अंदाजपत्राकात शेतकऱ्यासाठी तरतुद केलेली रक्कम सुद्धा पूर्ण खर्च केली जात नाही. 2005 – 06 च्या अंदाजपत्राकात शेतीक्षेत्रासाठी 1405 कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती त्यापैकी फक्त 1202.9 कोटी रुपये खर्च करण्यात आले. 2007–08 च्या अंदाजपत्राकात शेतीक्षेत्रासाठी 2222.4 कोटी रुपयांची तरतुद होती पण त्यापैकी फक्त 1195.78 कोटी रुपये खर्च करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना सरकारकडुन दिली जाणारी किमान हमी किंमत अतिशय कमी असते.

**11) शेतीतील संशाधने :**

भारतात शेतकऱ्यांना अत्याधुनिक संसाधने उपलब्ध करुन देण्याचे आव्हान शेतीक्षेत्रासमोर आहे. संकरित बीयाणे, रासायनीक खते, किटकनाशके अत्याधुनिक अवजारे इत्यादींच्या वापरामुळे शेतीच्या उत्पादनात व गुणवत्तेत मोठया प्रमाणात वाढ होते. भारतात अशा कृषी संसाधनाची कमतरता आहे. या संसाधनाचा वापर करुन भारत अन्नधान्यांच्या बाबतीत स्वयंपुर्ण होऊ शकतो. ही साधने उपलब्ध करुन देण्याचे आव्हान शेतीक्षेत्रासमोर आहे.

**भारतीय शेतीक्षेत्रासमोरील अनुकूलता :**

भारतीय शेतीक्षेत्रात ज्या प्रमाणे प्रतिकुलता आहेत त्याचप्रमाणे भारतीय कृषीक्षेत्रात अनेक अनुकूलता उपलब्ध आहेत. या संधीचा स्वीकार करुन शेतकरी व पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होऊ शकते. या अनुकूलता आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1. रोजगार उपलब्धता :**

भरतरीय शेती क्षेतात इतर क्षेत्राप्रमाणे रोजगाराच्या अनेक अनुकूलता उपलब्ध आहेत. शेतमालप्रक्रीया उद्योग, शेतीतज्ञ,कृषी बाजारपेठ, कृषी व्यापारी, कृषीमालाचा पुरवठा करणे, कृषी विद्यापीठ, शेती अर्थतज्ञ, कृषी बांधणी, अन्न आणि औषध विभाग शेती पत्रकार दत्यादी अनेक रोजगाराच्या अनुकूलता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्रात उपलब्ध आहेत. भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशात या रोजगार संधीचा फायदा घेणे गरजेचे आहे. भारतात जसजसा शेतीचा विकास होईल तसतसा रोजगार अनुकूलता वाढतील.

**2. कृषी पर्यटन :**

भारतासारख्या कृषी प्रधान देशात पर्यटननाचा विकास करण्याची अनुकूलता उपलब्ध आहे. कृषी पर्यटनामध्ये एखाद्या शेताला भेट देवुन तेथील वास्तवकि परिस्थिती पाहणे व त्याचा आस्वाद घेणे गरजेचे आहे. कृषी पर्यटनाच्या साहयाने शेतकऱ्यांचे उत्पन्न व रोजगार वाढण्यास मदत होऊ शकते. अमेरिका , ऑस्ट्रेलिया या सारख्या देशात कृषी पर्यटन हा मोठा व्यवसाय निर्माण झाला आहे. कृषी पर्यटनात विदेशी पर्यटकांना आकर्षित करुन परकिय चलन प्राप्त करुन घेण्याची अनुकूलता उपलब्ध आहे. भारतात सर्वात प्रथम कृषी पर्यटनाची सुरवात पांडुरंग तावरे यांनी बारामती कृषी पर्यटन केंद्रात केली. भारतात सर्व राज्यांत कृषी पर्यटनाची अनुकूलता उपलब्ध आहे.

**3. जोडधंदा :**

भारतात कृषी क्षेत्रात शेती क्षेत्रात कृषीला जोडधंदा करण्याची अनुकूलता उपलब्ध आहे. भारतात शेतीला जोडधंदा कमी प्रमाणात केला जातो. पण शेतीत शेती बरोबरच, पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, बायोगॅस, रेशीम, वराहपालन, मत्स्यशेती,

पर्यटन इत्यादी जोडधंदा करता येऊ शकतो. शेतीला जोडधंदा केल्याने शेतकऱ्याचे उत्पन्न वाढते. त्याचबरोबर अनेक व्यवसाय केल्याने एखाद्या व्यवसायात तोटा झाला तरीही इतर व्यवसायातुन नफ्याची शक्यता असते.

**4. परकीय चलन प्राप्ती :**

अत्याधुनिक पद्धतीने शेती करुन मोठया प्रमाणात परकीय चलन प्राप्त करण्याची अनुकूलता भारतीय शेतीक्षेत्रासमोर आहे. शेतीत चांगल्या दर्जेदार पिकांचे उत्पादन घेतल्यास त्याला परकिय बालारपेठत मागणी वाढते. भारतात परकिय चलन कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे शेतीतुन परकिय चलन प्राप्त करुन भारताच्या व्यवहारतोल समतोल साधण्याची अनुकूलता आहे.

**5. आधारभूत संरचना :**

भारतीय कृषी क्षेत्रात आधारभूत सुविंधांची कमतरता आहे. भारतात कृषी विकासावबरोबर पायाभूत सुविधा वाढविण्याची अनुकूलता उपलब्ध आहे.

**6. आर्थिक विकास :**

भारतीय शेतीक्षेत्रासमोर स्वःताचा विकास करण्यासोबत देशाचा आर्थिक विकास करण्याची अनुकूलता उपलब्ध आहे. शेतीच्या विकासाबरोबर त्यारवर आधारीत सर्व उद्योगधंदयांचा विकास होऊन देशाचा आर्थिक विकास होऊ शकतोकृ

**7. समतोलित प्रादेशिक विकास :**

भरताचा प्रादेशिक विकास असमतोलित आहे. काही प्रदेश (राज्य) विकसीत आहेत तर काही प्रदेश (राज्य) हे अविकसीत आहेत. त्यामुळे शेतीक्षेत्राचा विकास करुन आपल्याला समतोलित प्रादेशिक विकास साधता येऊ शकेल. याचे कारण असे की, शेती हा व्यवसाय संपुर्ण देशात पसरलेला आहे.

**समारोप :**

भारतीय कृषी क्षेत्रासमोरील प्रतिकुलता व अनुकूलता पाहिल्यानंतर असे लक्षात येते की भारतीय कृषी क्षेत्र सर्व देशभर पसरले आहे. कृषी क्षेत्रावर पडणारा परिणाम संपुर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा असतो. भारतीय कृषी क्षेत्रासमोर असणारी प्रतिकुलता दुर करणे अशक्य नाही. प्रयत्नपुर्वक अशी प्रतिकुलता दुर करण्याची आवश्यकता आहे. भारत सरकारने ही प्रतिकुलता दुर करण्यासाठी शेतकऱ्यांना सर्व प्रकारची मदत करणे आवश्यक आहे. सरकारच्या मदतीशिवाय ही प्रतिकुलता दुर करणे शक्य नाही. तसेच शेतकऱ्यांनीसुद्धा व्यापारी दृष्टीकोन स्विकारुन शेतीचा विकास करणे आवश्यक आहे. ही प्रतिकुलता दूर करण्यासाठी शेतकऱ्यांनी पारंपारीक दृष्टीकोन बाजूला ठेवुन आधुनिकीकरणाची कास धरणे आवश्यक आहे. परकीय स्पर्धेला घाबरण्यापेक्षा तिचा फायदा घेणे आवश्यक आहे.

शेतीक्षेत्राबारोबर शेतकऱ्यासमोर असणाऱ्या संधीचा त्यांनी योग्य वेळी स्विकार केला पाहीजे. शेतीक्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या नवनविन अनुकूलता ओळखुन त्या आत्मसात करणे गरजेचे आहे. शेतीसमोरील असणारी प्रतिकुलता दुर करुन व अनुकूलता स्विकारुनच शेतीक्षेत्राचा व पर्यायाने देशाचा विकास होऊ शकतो.

**संदर्भसूची :**

1) Agrawal A N Indian Agriculture, Vani Edu. Books 1986.
2) कायंदे–पाटील, शेतीचे आर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन नाशिक.
3) कविमंडळ विजय, कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर (2008)
4) कविमंडळ विजय, भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन, मंगेश प्रकाशन (1992)
5) देशपांडे श्रीधर व देशपांडे विनायक, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लीशिंग हाऊस.
6) Singh & Sandhu, Agricutural Problems in Indian Himalaya.
7) झामरे जी.एन. भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिकेशन नागपूर.

Vol - V Issue-I JANUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

8) Periodiculs : शेतकरी, बळीराजा योजना अर्थसंवाद.
9) WWW.ima-india.com/Indian Agriculture-challenges.
10) https://www.nabard.org.
11) https://apeda.gov.in
12) https://www.wikipedia.org

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com